सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

दूरध्वनी : 0253-2230580, 2230734, 2230118 फॅक्स : 2231716

संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

**परीक्षा व नोंदणी विभाग**

जा.क्र. : पनिका/नोंदणी/2017/ दिनांक : 31.08.2017.

प्रति,
मा. विभागीय संचालक,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विभागीय केंद्र,
द्वारा - अमरावती/औरंगाबाद/मुबंई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड

**विषय : शैक्षणिक सत्र 2017-18 : सर्व शिक्षणक्रम ऑनलाईन प्रवेश मुदत वाढीबाबत .....**

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष 2017-18 साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दिनांक 26.06.2017 पासून सुरू केलेली आहे हे आपणांस ज्ञात आहेच. शैक्षणिक सत्र 2017-18 ची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होत आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये **दिनांक 28 ते 30.08.2017 ह्या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे** विविध शिक्षणक्रमांच्या ऑनलाईन प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना आणि अभ्यासकेंद्राना आलेल्या अडचणींमुळे विद्यापीठास्तरावरून खालीलप्रमाणे प्रवेशाची मुदत वाढ करण्यात आलेली आहे.

| **नं.** | **नियोजित प्रवेश कालावधी** | **वाढीव प्रवेश कालावधी** | **शिक्षणक्रम** | **शुल्क तपशील** |
|---|---|---|---|---|
| **01** | **02** | **03** | **04** | **05** |
| 01 | दि. 26.6.2017 ते 14.8.2017 | दि. 26.6.2017 ते **5.9.2017** | सर्व शिक्षणक्रम * | विना विलंब * |
| 02 | दि. 16.8.2017 ते 31.8.2017 | दि. 06.9.2017 ते 15.9.2017 | सर्व शिक्षणक्रम * | विलंब शुल्क 100/- |
| 03 | दि. 01.9.2017 ते 15.9.2017 | दि. 16.9.2017 ते 30.9.2017 | सर्व शिक्षणक्रम ** | विलंब शुल्क 500/- |

* बी.एड. नियमित, बी.एड. स्पेशल, कृषी प्रथम वर्ष (मेरीट प्रवेश सोडून) शिक्षणक्रम सोडून इतर शिक्षणक्रमांना असणार आहे. द्वितीय वर्षासाठी उपरोक्तप्रमाणे प्रवेश सुरू असतील.

** पूर्वतयारी जून-सप्टेंबर ची तुकडी आणि सत्रनिहाय परीक्षा असणारे (डिसेंबर 2017 मध्ये होणाऱ्या परीक्षार्थ्यांसाठीच्या शिक्षणक्रमाचे) सर्व शिक्षणक्रम (पदवी आणि पदव्युत्तर) प्रवेशासाठी विलंब शुल्क रूपये 500/- असणार नाही कारण त्यांची परीक्षा लगेचच होणार असल्याने त्यांच्यासाठी फक्त विलंब शुल्क रूपये 100/- फक्त असेल.

उपरोक्त तक्त्यातील दिनांक 01 ते 05.09.2017 ह्या कालावधीत विना विलंब प्रवेश करावेत, तसेच विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क ह्या कालावधीत घेऊ नये याबाबत आपापल्या अंतर्गत असलेल्या अभ्यासकेंद्रांना पत्र, ईमेल द्वारे कळविण्यात यावे. तसेच लवकरात लवकर विहित वेळेत प्रवेश करण्याबाबत अभ्यासकेंद्रांना प्रोत्साहित करावे. सहकार्याबद्दल धन्यवाद ! कळावे.

आपला विश्वासू,

**प्रा.(डॉ.) अर्जुन घाटुळे**
***परीक्षा नियंत्रक***

प्रत माहितीसाठी - 1. मा. कुलगुरू, यचममु विद्यापीठ,नाशिक 2. मा. कुलसचिव, यचममु विद्यापीठ, नाशिक,
3. मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, 4. मा. संचालक, सर्व विद्याशाखा, यचममुवि, नाशिक